# खरा मित्र कोण ?

कलियुगात आणि खरा मित्र, वाचकजन हसतील जरूर. परंतु खऱ्या मित्राचा शोध सर्वांनाच राहतो. तर कोणी सुद्धा स्वतः कोणाचा खरा मित्र बनू इच्छित नाही. का? काय झाले आहे खऱ्या मित्रतो? स्वार्थाने मित्रतेला खाऊन टाकले आहे.

आजकाल तर सदाकाळाचे खरे मित्र शोधूनच सापडतात. इतिहास साक्षी आहे की मित्र निभावण्यात लोकांनी आपले सर्वस्व बलिदान केले परंतु आज तर मित्र, मित्राचा जीवसुद्धा घेतात. आजचे मित्र उदयाचे शत्रू बनतात.

मित्रता जोडणे तर सरळ आहे, परंतु मित्रता निभावणे अत्यंत कठीण आहे. अपेक्षा व स्वार्थ मित्रतेला स्थायी बनू देत नाही.

कोणाला म्हणता येईल खरा मित्र...जो वेळेवर सहयोग देईल, जो वेळेवर कामाला येईल, जो खरा रस्ता दाखवेल, जो खरा सल्ला देईल, जो बिघडलेले काम सुधारून देईल, खरी मित्रता दोन खऱ्या हृदयांचे मिलन आहे. खरेपणाच मित्रतेचा आधार आहे. मित्रता जर केवळ मनोरंजनासाठी आहे, व्यसन तृप्तीसाठी असेल तर ती मित्रता नाही शत्रूता आहे. जो मित्र स्वतःचा फायदा-तोटा बघून मित्रता निभावतो तो खरा मित्र नाही.

भाग्यवान ते आहेत ज्यांना चांगले व खरे मित्र मिळाले आहेत. ते आणखीनच भाग्यवान आहेत ज्यांचे मित्र कोणी महान पुरूष आहेत, ज्यांच्या सहवासात ईश्वरीय मार्गावर प्रगती करण्याचे मार्गदर्शन मिळत आहे, जे दुःख वाटून घेत असतील आणि जीवनात प्रत्येक पावलागणिक साथ निभावित असतील.

भगवंत आमचा परममित्र आहे. तो एकदा येऊन मनुष्यांचा खरा मित्र बनतो. तो अशी मित्रता निभावतो की आमचे गमावलेले राज्य भाग्य आम्हाला मिळवून देतो, आमचे जन्मो-जन्मींचे कष्ट दूर करतो व आम्हाला खरा मार्ग दाखवितो.

जर आपण त्याला आपला खरा खुरा दोस्त बनविले तर आपले जीवन कमळाप्रमाणे खुलेल. आपण निर्भय व निश्चिंत बनाल. बोला पसंत आहे, भगवंताशी दोस्ती. बस त्यासाठी पाहिजे खरे व पवित्र हृदय. खुदा-दोस्ताची ओळख आणि त्याच्याशी स्नेह. तोच परम मित्र आहे जो नेहमी मित्रता निभावतो. धन्य आहेत ते लोक ज्यांनी जीवन यात्रेत भगवंताला आपला मित्र बनविले आहे.

त्याची मित्रता परम कल्याणकारी आहे, मनुष्याला देवता बनविणारी आहे, सदाकाळासाठी सुख-शान्ति व खुशी देणारी आहे. जर आपण सुद्धा त्याच्याशी मित्रता निभावली तर तो आमच्यावर कुर्बान होईल, तर या खुदाच्या अलौकिकतेचा, दोस्तीचा अलौकिक अनुभव प्राप्त करा.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

www.bkvarta.com